# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 02/07/2020 (गुरूवार)

(दुपार)


### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. रामटेक – दिनांक 30/06/2020 चे 06.00 वा. ते 06.15 वा. चे सुमारास पो.स्टे. रामटेक हद्दीत फिर्यादी यांची 17 वर्षीय अल्पवयीन मुलगी हि सकाळी 06:00 वा. दरम्यान झोपुन उठली व 06:15 वा. शौचालयास गेली परंतु घरी परत आली नाही तिचा आजुबाजुला व नातेवाईकांकडे शोध घेतला असता मिळुन आली नाही. तसेच रा़त्री दरम्यान माहित पडले की, फिर्यादीच्या गावात राहणारा आरोपी नामे– अभय सरपाते नावाचा मुलगा देखील गावात नाही म्हणुन फिर्यादी यांची मुलगी त्याचे सोबत गेल्या असल्याचा संशय फिर्यादीस आहे. आरोपीने फिर्यादीच्या मुलीला कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा रावते 9420409454 करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर